संं.फौ.ख.क्र. २७४/२०१५
सरकार-वि- रविंद्र
निशाणी क्र. १८

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव** - पिंकी देवराव मलेवार

**वय** - ३२ वर्ष, **व्यवसाय** - गृहिणी

**पत्ता** - दिघोरी, नागपूर, जि. नागपूर.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत.**

घटना दि. २८.०२.२०१५ रोजी दुपारी १२.०० ते १२.३० वाजताच्या दरम्यान आम्ही सिल्लेवाडावरून परत येतांना अन्ना मोड, मुन्ना गॅरेज समोर इंडिका कारने इंडिकेटर न देता राईट टर्न मारला. त्यामुळे मी व माझा भाऊ चेतन मलेवार बाईकवरून पडलो. माझ्या डोक्याला, ब्रेस्टला व हाताला लागले. माझ्या भावाला दोन्ही हाताला, पायाला व कंबरेला लागले. सुरेंद्र कोठारी व चंद्रकांत करमुके यांनी आम्हाला शांती हॉस्पीटलला नेले. तेथून डब्ल्यू.सी.एल. हॉस्पीटलला ॲडमिट केले. मी आरोपीला ओळखत नाही.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पी. वाय. मनपे यांचेमार्फत**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, मला गाडीचा क्रमांक आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गाडी कोण चालवत होते हे मला माहित नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.04.21 15:49:57 +0530

सावनेर,
दिनांक २१.०४.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe